राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ पुणे यांचे समोरील माहिती अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १८ अन्वये दाखल झालेला तक्रार अर्ज

तक्रार क्र.रामाआ /३१७/२०२३/कोल्हापूर

राज्य माहिती आयोग, खंडपीठ पुणे,
नवीन प्रशासकीय इमारत,
विधान भवना समोर, पुणे - १

| अपिलार्थी | उत्तरवादी | |
|---|---|---|
| | जन माहिती अधिकारी तथा | प्रथम अपिलीय अधिकारी तथा |
| राजाराम शंकर शिणगारे | श्री. दिगंबर सानप, नायब तहसिलदार, तहसिल कार्यालय हातकणंगले, ता. हातकणंगले, जि.कोल्हापूर | तहसिलदार, तहसिल कार्यालय हातकणंगले, ता. हातकणंगले, जि.कोल्हापूर |

द्वितीय अपील सुनावणी दिनांक- १४.१२.२०२३

तक्रारदार यांनी दि. १२.०४.२०२३ रोजीच्या अर्जान्वये राज्य माहिती आयोगाकडे तक्रार अर्ज दाखल केला आहे.

तक्रारदार यांनी त्यांच्या तक्रार अर्जात खालीलप्रमाणे तक्रार केलेली आहे.

"आयोगाने व्दितीय अपील क्रमांक ९४६/२०१७ मध्ये दि. ०८.०३.२०१९ रोजी पारीत केलेल्या आदेशाप्रमाणे माहिती दिली नाही."

आयोगाने व्दितीय अपील क्रमांक ९४६/२०१७ मध्ये दि. ०८.०३.२०१९ रोजी अपिलार्थीस अद्यापही माहिती देण्यात आली नसल्यामुळे विद्यमान जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसिलदार, हातकणंगले जि. कोल्हापूर यांनी अपिलार्थीरस जोडपत्र- अ मध्ये मागितलेली स्थायी आदेशाची माहिती नोंदणीकृत डाकेने विनाशुल्क पुरवावी. उर्वरित माहितीसाठी अपिलार्थीस अवलोकनाची संधी देऊन मागणी केलेली माहिती सशुल्क पुरवावी, व तसा अनुपालन अहवाल दि. १२.०६.२०१९ रोजी आयोगासमोर समक्ष हजर राहून सादर करावा.

त्यामध्ये दि. १४.१२.२०२३ रोजी सुनावणी आयोजित केली असता तक्रारदार हजर होते. तर जन माहिती अधिकारी गैरहजर होते.

सुनावणीचे वेळी तक्रारदार यांनी सूचीत केले की, आयोगाच्या आदेशाप्रमाणे आजपर्यंत माहिती दिली नाही. आयोगाचे आदेशाचे वेळी जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसिलदार, हातकणंगले जि. कोल्हापूर, श्री. दिगंबर सानप हे होते, सध्या ते कोल्हापूर जिल्हाधिकारी कार्यालय येथे कार्यरत आहेत.

आयोगाकडील उपलब्ध अभिलेखावरुन दिसुन येते की, आयोगाचे आदेशाचे वेळचे विद्यमान जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसिलदार, हातकणंगले जि. कोल्हापूर यांनी आयोगाच्या आदेशानुसार केलेल्या अंमलबजावणीचे कोणतेही अभिलेख आयोगास सादर केले नाही. तसेच अनुपस्थितीबाबत कोणतीही सुचना न देता सुनावणीस गैरहजर राहिलेले आहेत.

उपरोक्त पार्श्वभूमिवर आयोग खालील प्रमाणे आदेश देत आहे.

**अंतरिम आदेश.**

१. श्री. दिगंबर सानप, जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसिलदार, हातकणंगले जि. कोल्हापूर यांनी आयोगाने व्दितीय अपिल क्रमांक क्रमांक ९४६/२०१७ मध्ये दि. ०८.०३.२०१९ रोजी जे आदेश पारित केले होते त्या आदेशाची अंमलबजावणी जन माहिती अधिकारी यांनी का केली नाही. याबाबतचा लेखी खुलासा आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसांचे आत आयोगास सादर करावा, विहित मुदतीत खुलासा सादर न केल्यास आपणास काही म्हणावयाचे नाही असे गृहित धरुन त्यांचे विरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम २०(१) नुसार रु. २५०००/- (रुपये पंचवीस हजार फक्त) शास्तीची कार्यवाही करण्यात येईल.

२. तहसिलदार,तहसिल कार्यालय हातकणंगले, ता. हातकणंगले, जि.कोल्हापूर यांनी वरील आदेशाची विहीत कालावधीत अंमलबजावणी होईल याबाबतची दक्षता घ्यावी.

( समीर सहाय )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ पुणे.